# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.10.2025** **वारःसोमवार**

---

1. बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना आज जारी होणार;
2. बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागा वाटप जाहीर
3. महाराष्ट्रातल्या मंडणगड दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते उद्घाटन
4. देशभरात आज शालेय स्तरावरील विकसित भारत बिल्डथॉन स्पर्धेचं आयोजन
5. गाझा शांतता कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी आज इजिप्तमध्ये शिखर परिषद आणि
6. दिल्ली क्रिकेट कसोटीमध्ये वेस्ट इंडिजवर फॉलो ऑनची नामुष्की; तर महिला क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाची भारतावर मात

**<u>बिहार अधिसूचना</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना आज जारी करण्यात येणार आहे. याबरोबरच, 20 जिल्ह्यांमधील 122 विधानसभा मतदारसंघांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेलाही सुरुवात होईल. या टप्प्यासाठी 11 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख 20 ऑक्टोबर असून 21 तारखेला या अर्जाची पडताळणी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख 23 ऑक्टोबर आहे. 243 सदस्य असलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या दोन्ही टप्प्यांसाठी मतमोजणी 14 नोव्हेंबर रोजी होणार आहे.

**<u>भाजप-बैठक</u>**

दरम्यान बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक काल रात्री नवी दिल्लीतल्या पक्षाच्या मुख्यालयात बैठक झाली. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा आणि इतर वरिष्ठ पक्ष नेते उपस्थित होते. बिहार विधानसभा निवडणुकांसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागावाटप जाहीर झाल्यानंतर पक्षाचं धोरण आणि उमेदवारांच्या यादीला अंतिम स्वरूप देण्याच्या उद्देशाने भाजपानं ही बैठक घेतली. दरम्यान एनडीएने काल बिहार विधानसभा निवडणुकांसाठी जागा -वाटप जाहीर केलं. भाजप आणि जनता दल युनायटेड प्रत्येकी 101 जागांसाठी लढतील, तर लोक जनशक्ती पक्ष राम विलास 29 जागांसाठी लढणार आहे. राष्ट्रवादी लोक मोर्चा आणि हिंदुस्तानी आवाम मोर्चाला प्रत्येकी सहा जागा दिल्या आहेत. निवडणुकीत NDA चा सामना, विरोधी पक्षांच्या INDI आघाडीशी होणार आहे. INDI आघाडीनं अद्याप आपलं जागा वाटप जाहीर केलेलं नाही. बिहार विधानसभा निवडणुकीसाठी 6 नोव्हेंबर आणि 11 नोव्हेंबर, अशा 2 टप्प्यात मतदान होणार आहे.

**<u>न्यायालय-रत्नागिरी</u>**

मंडणगड इथं झालेल्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, अशी आशा देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल मंडणगड इथं व्यक्त केली. महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातल्या मंडणगड इथं दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचं

उद्घाटन काल त्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. न्यायालयाच्या आवारातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरणही यावेळी करण्यात आलं. नव्या न्यायालयाच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं समानतेचं स्वप्न साकार होईल, असं सरन्यायाधीश यावेळी म्हणाले...

**आज आपण बघतो आहोत की देश प्रगती पथावरती आहे. देश एक संघ आहे. देशामध्ये इंटरनल इमर्जन्सी सुद्धा आल्या. परंतु देश हा अखंड राहिला. आणि जेव्हा आपण आपल्या शेजाऱ्यांसोबत आपल्याला आपण कंपेअर करतो. मग ते नेपाळ असो किंवा बांगलादेश असो किंवा श्रीलंका असो तिथली परिस्थिती आणि आपली परिस्थिती यामध्ये जो अतिशय डिफरन्स आहे तो माझ्या मते भारतीय राज्यघटनेमुळेच आहे. न्याय हा पक्षकाराच्या दारात पोहोचला पाहिजे आणि म्हणून ठिकठिकाणी न्यायालय उभा करतो. या इमारतीतून शेवटच्या नागरिकाला जो लास्ट सिटिझन आहे, त्याला कमीत कमी वेळात आणि कमीत कमी खर्चात न्याय मिळेल या दृष्टीनं आपण सर्वजण प्रयत्न राहाल. अशी अपेक्षा व्यक्त करतो. जेणेकरून बाबासाहेबांचं सामाजिक आणि आर्थिक समानतेचं स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीनं आपण ती एक फुल फुलाची पाक म्हणून तो एक त्यांना श्रद्धांजली राहील, आदरांजली राहील.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे इथल्या स्मारकाच्या आराखड्याला वेग देण्याचं काम करु, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. न्यायपालिकेचं नेतृत्व आणि सरकारची इच्छाशक्ती एकत्र आली की न्याय सर्वापर्यंत पोहोचतो, मंदिरं उभारण्याबरोबरच न्यायमंदिरं उभारणंही पुण्याचं काम आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. या वेळी बांधकाम कामगारांचाही प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला.

**बिल्डथॉन**

देशातील शालेय स्तरावरील 'विकसित भारत बिल्डथॉन 2025' ही हॅकेथॉन स्पर्धा, आज सकाळी 10 ते रात्री 11 वाजेपर्यंत होणार आहे. देशभरातल्या शाळांमधील इयत्ता 6 वी ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना त्यांची सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य दाखवण्यासाठी सक्षम बनवणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यावर्षीची स्पर्धा, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या चार संकल्पनांवर आधारित आहे. या स्पर्धेतील, राष्ट्रीय स्तरावरील 10, राज्यस्तरावरील 100 आणि जिल्हास्तरावरील 1 हजार विजेत्यांना एकंदर 1 कोटी रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत.

**गाजा शांति सम्मेलन**

गाझा युद्ध संपवण्याच्या पार्श्वभूमीवर, शांतता कराराला अंतिम रूप देण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय शिखर परिषद आज इजिप्तच्या शर्म एल-शेख इथं होत आहे. यावेळी गाझा पट्टीतील युद्ध थांबवण्यावर, तसंच पश्चिम आशियातली सुरक्षितता आणि स्थैर्य या मुद्द्यांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फत्ताह अल-सिसी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या बैठकीचे सहअध्यक्षपद भूषावणार आहेत. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस देखील या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर 20 पेक्षा जास्त देशांचे नेते या बैठकीला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. केंद्रीय परराष्ट्र व्यवहार राज्य मंत्री कीर्ति वर्द्धन सिंह या शांति सम्मेलनात भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी इस्राईल आणि हमास यांच्यातल्या शांतता योजनेच्या पहिल्या टप्प्यात झालेल्या कराराचं स्वागत केलं आहे.

**कॅमेरून निवडणूक**

कॅमेरूनमध्ये काल राष्ट्रपती पदाची निवडणूक झाली. विश्लेषकांनी अध्यक्ष पॉल बिया यांच्या विजयाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे अफ्रिकेतल्या या सर्वात ज्येष्ठ नेत्याला आणखी सात वर्षे राजवटीची संधी मिळू शकणार आहे. सध्या पॉल बिया 92 वर्षांचे असून त्यांचा कार्यकाळ समाप्त होईपर्यंत ते 99 वर्षांचे असतील. कॅमरून चे पहिले राष्ट्रपति अहमदु अहिजो यांच्या

राजीनाम्यानंतर 1982 मध्ये ते पहिल्यांदा सत्तेत आले आणि तेव्हापासून 7 निवडणुकांमध्ये विजयी होत, ते देशावर राज्य करत आहेत.

**<u>शहा-जयपूर</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज राजस्थानच्या एका दिवसाच्या भेटीवर जयपूर इथं जाणार आहेत. तीन नवीन फौजदारी कायदे लागू होऊन एक वर्ष पूर्ण झालं आहे, त्यानिमित्त जयपूरमध्ये राज्यस्तरीय प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे, त्याचं उद्घाटन अमित शहा करणार आहेत. आजपासून सुरू होणाऱ्या 6 दिवसांच्या या प्रदर्शनात या तीन फौजदारी कायदयांमधील तरतूद आणि राजस्थानमध्ये त्यांची झालेली अंमलबजावणी दर्शवण्यात येणार आहे. उद्घाटनानंतर शहा जनतेला संबोधित करतील. रायझिंग राजस्थान ग्लोबल इनव्हेस्टमेंट समिट 2024 अंतर्गत मिळालेल्या चार लाख कोटी रुपयांच्या करारातील, विविध योजनांच्या उद्घाटन आणि भूमिपूजनही त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>डॉन वनीत कुमार सेहगल-गोवा</u>**

भारतीय अर्थव्यवस्थेला जगभरात सन्मान मिळत असल्याचं प्रतिपादन प्रसार भारतीचे अध्यक्ष डॉ. नवनीत कुमार सेहगल यांनी केलं. ते काल गोव्यात लोकसेवेतल्या ICAI सदस्यांच्या निवासी बैठकीत बोलत होते. भारताचा विकास दर सुमारे 6 पूर्णांक 8 ते 7 टक्के इतका आहे - त्यामुळे इतर देशांचा भारताकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला असून ते आता भारताकडे आदरांनं बघत आहेत, असं सेहगल म्हणाले. 2047 पर्यंतच्या विकसित भारताची संकल्पना साकारण्यामध्ये चार्टर्ड अकाऊंटंट्सची भूमिका हा या बैठकीचा विषय होता.

**<u>क्रिकेट-भारत-वेस्ट इंडीज</u>**

नवी दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर सुरु असलेल्या भारत आणि वेस्ट इंडीज क्रिकेट संघांदरम्यानच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात कालच्या तिसऱ्या दिवसअखेर वेस्ट इंडीजच्या दुसऱ्या डावात 2 गडी बाद 173 धावा झाल्या आहेत. वेस्ट इंडीज संघ अजूनही 97 धावांनी पिछाडीवर आहे. भारताने दिलेल्या 518 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाहुण्या संघाचा पहिला डाव 248 धावांत संपुष्टात आल्यामुळे त्यांच्यावर फोलो-ऑनची नामुष्की ओढवली. भारताने पहिल्या डावात पाच गडी बाद 518 धावसंख्येवर डाव घोषित केला.

**<u>महिला क्रिकेट विश्वचषक</u>**

महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल विशाखापट्टणममध्ये झालेल्या चुरशीच्या सामन्यात ऑस्ट्रेलिया संघाने भारतीय संघाचा पराभव केला. भारताने प्रथम फलंदाजी करताना 330 इतकी मोठी धावसंख्या उभारली. स्म्रिती मान्धानाने 66 चेंडून 80 धावा फटकावल्या. याचबरोबर, स्मृतीनं आपल्या करकीर्दीतील 5 हजार धावांचा टप्पा पार केला तसार एक दिवसीय सामन्यांमध्ये, एकाच वर्षात 1 हजार धावा पूर्ण करत तिने इतिहास रचला. भारतानं दिलेलं 331 धावांचं आव्हान ऑस्ट्रेलियानं तीन खेळाडू राखून पूर्ण केलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार